# <u>नियमित दिवाणी दावा क्र. ४९८/२०२५</u>.

सुरेश खाशाबा पवार व इतर विाा जयवंत प्रल्हाद पवार व इतर.

CNR No.- MHST070045932025.

## <u>निशाणी क्र. २५ वरील आदेश</u>

१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादींच्या वतीने यादीसोबत, दावा मिळकतींसंदर्भात फेरफार उतारे व मुल्यांकन पत्रक, हे कागदपत्र दाखल करणेस परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे.

२. वादींच्या वतीने सदर अर्जावर म्हणणे दाखल करून आक्षेप नोंदविला आहे.

३. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. उभयपक्षांतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रस्तुतचा अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता पुढील वादप्रश्न विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदिवण्यात येत आहेत;

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे काय ? | **होय.** |
| २) | आदेश काय ? | **अर्ज मंजूर करण्यात येतो.** |

### <u>:: कारणमिमांसा ::</u>

**<u>वादप्रश्न क्र.१ करीता</u> :–**

५. अभिलेखाचा विचार करता, प्रस्तुत दावा विरुध्द कब्जाने मालकी हक्क असल्याचे जाहीर ठराव करुन निरंतर ताकीदीबाबत आहे. दावा मिळकत स्थावर मालमत्ता आहे. नियोजीत कागदपत्र दावा मिळकती संदर्भातील वस्तुस्थिती स्पष्ट करणारे व वादाशी निगडीत आहेत. त्यामुळे सदर कागदपत्र प्रकरणाशी संबंधीत आहे. वादाचे स्वरूप पाहता, उभय पक्षकारांमधील वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत होणे आवश्यक आहे. त्याकरीता, उभय पक्षकारांनी दाखल केलेली कागदपत्रे अभिलेखावर असणे जरूरीचे आहे. अर्ज मंजूर केल्यास वादींचे काही एक नुकसान होणार नाही. तथापि, उभय पक्षकारास पुरावा देण्याची संधी प्राप्त होऊन वादाचे निवारण होणार आहे. या उलट, अर्ज नामंजूर झाल्यास प्रतिवादींस नैसर्गीक न्याय तत्व नाकारले जाऊन प्रकरणांची गुंतागुंत

वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे मी या मतास आहे की, अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, वादप्रश्न क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवीला आहे.

**<u>वादप्रश्न क्र.२ करीता</u> :–**

६. उपरोक्त उहापोह विचारात घेता अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. त्यामुळे वादाचे स्वरूप विचारात घेता, मी या मतास आहे की, दाव्याच्या प्राथमिक स्थितीत कोणा एका पक्षकारावर खर्च बसवणे योग्य व न्यायाचे नाही. सबब, न्यायदृष्टीने, मी पुढीलप्रमाणे आदेश करीत आहे;

**<u>आदेश</u>**

१) प्रतिवादींचा अर्ज निशाणी क्र. २५ मंजूर करण्यात येतो.

२) या अर्जाचा खर्च अंतीम निर्णय ज्याच्या पक्षात होईल त्यास देणेत यावा.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

Digitally signed by UTPAT ATUL ARUN
Date: 2025.12.19 17:39:35 +0530

(अ.अ. उत्पात)

दिनांक :– १९/१२/२०२५.

५ वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कराड, जि. सातारा.